कळमनुरी.
दिनांक :– २१.१२.२०२०

**प्रेसनोट**

**लोकसेवक बेले, तलाठी, सज्जा सेलसुरा व लोकसेवक हमीद, कोतवाल, तहसिल कळमनुरी यांनी लाचेची मागणी केल्यावरून गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले बाबत...**

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक १६.१२.२०२० रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे तक्रार दिली होती की, त्यांचे हातमाली शेत शिवारातील गट क्र. १४६ व गट क्र. ११८ मधील शेताचे ऑनलाईन फेरफारमधे दुरूस्ती करून देण्यासाठी व त्या दुरूस्तीस तहसिल कार्यालयातुन ओळखीने मंजूरी करून देण्यासाठी तलाठी बेले, सज्जा सेलसुरा हे ५,०००/–रू. ची लाचेची मागणी करीत आहेत.

त्यावरून दिनांक १६.१२.२०२० रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक बेले, तलाठी, सज्जा सेलसुरा, तहसिल कळमनुरी यांनी तक्रारदार याना त्यांचे शेताचे ऑनलाईन फेरफारमधे दुरूस्ती करून देण्यासाठी व त्यास तहसिल कार्यालयातुन ओळखीने मंजूरी मिळवून देण्यासाठी ५,०००/–रू. ची लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम तहसिल कार्यालयात ऑनलाईनची कामे करणारे हमीद, कोतवाल यांचेकडे देण्याचे सांगितले होते. तसेच पडताळणी दरम्यान हमीद, कोतवाल यांनी तक्रारदार यांचे शेताचे ऑनलाईन फेरफारमधे दुरूस्ती करून देण्यासाठी त्यांचेकडे ५,०००/–रू. ची लाचेची मागणी केली होती.

त्यानतर दिनाक १७.१२.२०२० रोजी व दिनांक २१.१२.२०२० रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीमधे लोकसेवक बेले, तलाठी व लोकसेवक हमीद, कोतवाल यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी तक्रारदार यांचेकडून लाच स्विकारण्याचे टाळले.

त्यावरून लोकसेवक बेले, तलाठी, सज्जा सेलसुरा व लोकसेवक हमीद, कोतवाल, तहसिल कार्यालय कळमनुरी यांचेविरूध्द पोलीस स्टेशन कळमनुरी येथे गु.र.क्र. ४२१/२०२० कलम ७, ७ A भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **तसेच लोकसेवक गंगाराम संभाजी बेले, तलाठी, सज्जा सेलसुरा अतिरीक्त कार्यभार वारंगा तर्फे नांदापूर, तहसिल कळमनुरी, रा. कळमनुरी व लोकसेवक शेख हमीद पाशुमियाँ, कोतवाल सज्जा शिंदगी, प्रतिनियुक्तीवर तहसिल कार्यालय कळमनुरी, रा. कळमनुरी यांना ताब्यात घेण्यात आले आहे व पुढील कार्यवाही सुरू आहे.**

ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षिका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षिका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस उपअधीक्षक श्री नितीन देशमुख यांनी पोलीस निरीक्षक श्रीमती ममता अफुने, सपोउपनि श्री बुरकुले, पोहेकॉ श्री विजयकुमार उपरे, पोना श्री संतोष दुमाने, पोना महारुद्र कवाडे, पोना श्री ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना श्री तानाजी मुंढे, पोना श्री विनोद देशमुख, पोशि श्री अविनाश किर्तनकार, व पोशि प्रमोद थोरात, व चापोना श्री हिम्मतराव सरनाईक अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.–१०६४, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५,**
**मोबाईल क्रमांक :–९९२३०४२५६५, ८१७७८१८८२५ व ८३९०७६१५०३.**

Scanned by CamScanner